# सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद धाराशिव

Email-dyceo.gaddharashiv@gmail.com Tel- 02472-223388


जा.क/जिपधा/साप्रवि/ने-4/अंकपा/1866/2025 दि.-14 / 09 /2025

## अनुकंपा पदभरती 2025 उमेदवारांचे पसंतीक्रम विकल्प देणे बाबत

धाराशिव जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गत सन-2025 मधील अनुकंपा तत्वावर नेमणुक देणे बाबत प्रतिक्षासुचीवरील अ.क्र.1 ते 157 उमेदवारांची प्रतिक्षासूची दिनांक 02/09/2025 रोजी जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येऊन प्रतिक्षासुचीवरील अ.क्र. 01 ते 157 उमेदवारांचे कागदपत्र पडताळणी बाबत दिनांक- 03/09/2025, दि. 04/09/2025 तसेच दिनांक- 08/09/2025 रोजी जिल्हा परिषद स्तरावर कॅम्प आयोजित करण्यात येऊन ज्या उमेदवारांची कागदपत्र अपूर्ण आहेत अशा उमेदवारांना तात्काळ कागदपत्राची पुर्तता करण्याबाबत कळविण्यात आलेले होते.

यासंदर्भात उमेदवारांमार्फत सादर कागदपत्रानुसार त्यांचे शैक्षणिक पात्रतेप्रमाणे संबंधित उमेदवारांना गट-क व गट-ड पदावर नियुक्तीने पदस्थापना देण्यापूर्वी अशा सर्व संबंधित उमेदवारांमार्फत दि.15/09/2025 रोजी (कार्यालयीन वेळेत) पसंतीक्रमाबाबत विकल्प घेण्यात येणार आहेत. उक्त दिनांकास प्रतिक्षासुचीवरील उमेदवारांकडून गट-क च्या रिक्त पदाअभावी गट-ड पदासाठीचे पसंतीक्रमाचे देखील विकल्प घेण्यात येणार आहेत.

तरी प्रतिक्षासुचीवरील प्रस्ताव पूर्ण असलेल्या उमेदवारांनी त्यांचे पसंतीक्रम विकल्प देण्यासाठी दि.15/09/2025 रोजी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून त्यांचे विकल्प सादर करावेत.

(तुकाराम भालके)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद धाराशिव